**महाराष्ट्र शासन**

क्रमांक :- आव्यप्र-२०२०/प्र.क्र.९२/आव्यप्र-१

महसूल व वन विभाग,

(आपत्ती व्यवस्थापन,मदत व पुनर्वसन)

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दिनांक :- १६.४.२०२१

प्रति,

नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,

महाराष्ट्र राज्य, पुणे.

विषय :- कोविड विषाणू प्रतिबंधासाठी शासनाने दि.१३.४.२०२१ रोजीच्या अधिसूचनेन्वये लागू केलेल्या निर्बंधाच्या कालावधीत दस्त नोंदणीसाठी परवानगी देणेबाबत.

संदर्भ:- महसूल व वन विभाग (आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन) आदेश क्र.डीएमयू-२०२०/प्र.क्र.९२/ डीआयएसएम-१, दि.१३.४.२०२१ .

महाराष्ट्र राज्यात कोविड-१९ विषाणूचा फैलाव मोठ्या प्रमाणात होण्याचा धोका असल्याने कोरोना संक्रमणाची साखळी खंडीत करण्यासाठी संदर्भाधीन आदेशान्वये निर्बंध लागू करण्यात आले आहेत. राज्यात कलम १४४ व रात्रीची संचारबंदी लागू केली असल्याने वैध कारणाशिवाय कोणालाही सार्वजनिक ठिकाणी ये-जा करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे.

अत्यावश्यक सेवा वगळता सर्व आस्थापना सार्वजनिक ठिकाणे, कार्य (व्यवहार), सेवा यांना बंदी घालण्यात आली आहे. केंद्र शासनाची, राज्य शासनाची व स्थानिक प्रशासनाची कार्यालये, त्यांची सांविधिक प्राधिकरणे व संघटना यांची कार्यालये सुरु ठेवण्यास सूट दिलेली आहे. त्यानुषंगाने नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अधिनस्त असलेली दुय्यम निबंधक कार्यालये सुरु ठेवण्यात आली आहेत.

मुद्रांक विभागामार्फत मुद्रांक शुल्क सवलत योजना जाहिर करण्यात आली होती त्यास अनुसरुन पक्षकारांनी बऱ्याच प्रमाणात सदर सवलतीचा फायदा डिसेंबर २०२० पर्यंत घेऊन मुद्रांक शुल्क खरेदी करुन दस्त निष्पादीत करुन ठेवले आहेत. नोंदणी अधिनियमाच्या कलम २३ प्रमाणे निष्पादीत केलेले दस्त पक्षकारांना दुय्यम निबंधक कार्यालयामध्ये निष्पादनाच्या दिनांकापासून चार महिन्यात दाखल करणे बंधनकारक आहे. अन्यथा अशा दस्तांना कलम २५ प्रमाणे पुढील चार महिन्यामध्ये नोंदणी फीच्या अनुक्रमे अडीच, पाच, साडेसात व दहा पट एवढी मोठी शास्ती भरावी लागेल. पक्षकारांना शास्तीची रक्कम भरावी लागू नये म्हणून नोंदणी महानिरीक्षक पुणे यांच्या दिनांक ६.४.२०२१ च्या परिपत्रकान्वये देण्यात आलेल्या सुचनांचे पालन करण्याच्या अटींवर दिनांक ३१.१२.२०२० पर्यंत निष्पादीत केलेल्या दस्तांची नोंदणी करण्यास पक्षकारांनी उपस्थित राहणे हे वैध कारण असल्याचे समजण्यात यावे व त्याकरिता दुय्यम निबंधक कार्यालयाकडून देण्यात आलेले दिनांक व वेळेचे पत्र ग्राह्य धरण्यात यावे, ही विनंती.

(श्रीरंग घोलप)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत माहिती व उचित कार्यवाहीसाठी रवाना:-

१) जिल्हाधिकारी(सर्व)

२) पोलिस आयुक्त(सर्व)

३) जिल्हा पोलिस अधिक्षक(सर्व)

Scanned with CamScanner